# प्रेसनोट

ला.प्र. विभाग, धुळे
दिनांक ३०.०४.२०२६

**नितीन नारायण वारकर, तांत्रिक सहायक, पंचायत समिती, साक्री यांनी तक्रारदार यांच्याकडे १५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १०,०००/— रुपये लाचेची रक्कम त्यांनी स्वत: स्विकारल्याने गुन्हा**

| | |
|---|---|
| ला. प्र. विभाग | धुळे |
| पो. ठाणे, गुन्हा नोंद क्र. | साक्री पो.स्टे. गुरनं. १२२ / २०२६ |
| कलम व गुन्हा दाखल दि | भ्र.प्र. कायदा कलम ७ प्रमाणे, दि.३०.०४.२०२६ |
| आरोपीचे नांव, वय व कार्यालय | नितीन नारायण वारकर, वय ५२ वर्षे, तांत्रिक सहायक, पंचायत समिती साक्री, रा. बाहुबली नगर, प्लॉट नं. ५२, साक्री रोड, धळे मो. नं. ८३९०९७६३७१ |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रुपये (तडजोडीअंती) |

**थोडक्यात हकिगत :—** यातील तक्रारदार यांचा भाउ यांस महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रिय रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०२३ — २४ मध्ये विहिर खोदण्यासाठी ४ लाख रुपये मंजुर होवुन विहिरीचे काम सुरु करण्यासाठी गटविकास अधिकारी, साक्री यांनी दि.०८.११.२०२३ रोजी कार्यारंभ आदेश दिला होता. त्याप्रमाणे तक्रारदार यांच्या भावाने विहिरीचे काम सुरु करुन विहिरीच्या झालेल्या कामाप्रमाणे त्यांना अनुदानाचे एकुण पंधरा हप्ते मिळाले आहेत. त्यानंतर उर्वरीत अनुदान मिळणेकामी तांत्रिक सहायक नितीन वारकर यांनी दि.१६.०२.२०२६ रोजी विहिरीचे मोजमाप करुन झालेल्या कामाच्या १,६२,३२० /— रुपये मुल्यांकनाची मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंद केली होती.

सदर अनुदान मिळणेकरीता तक्रारदार यांनी पंचायत समिती कार्यालयात जावुन तांत्रिक सहायक नितीन वारकर यांची भेट घेतली असता त्यांनी मोजमाप पुस्तिका तपासणी करीता शाखा अभियंता यांच्याकडे पाठविण्याकरीता तक्रारदार यांच्याकडे १५,०००/— रुपये लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी ला.प्र.वि. धुळे कार्यालयात समक्ष हजर राहुन आज दि.३०.०४.२०२६ रोजी तक्रार दिली होती.

सदर तक्रारीची आज रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता तांत्रिक सहायक नितीन वारकर यांनी तक्रारदार यांच्याकडे १५,०००/— रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती १०,०००/— रुपये लाच स्विकारण्याचे मान्य केले होते.

त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान तांत्रिक सहायक नितीन वारकर यांनी तक्रारदार यांचेकडुन १०,०००/— रुपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारतांना त्यांना रंगेहात पकडण्यात आल्याने गुन्हा

| | |
|---|---|
| सापळा अधिकारी | सचिन साळुंखे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| तपास अधिकारी | पद्मावती कलाल, पोलीस निरीक्षक, ला.प्र. विभाग, धुळे |
| सापळा पथक | पोहेकॉ. राजन कदम, मुकेश अहिरे, संतोष पावरा, प्रविण मोरे, पोकॉ. मकरंद पाटील, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, चंद्रकांत सैंदाणे, मपोकॉ. रेश्मा परदेशी, पोहेकॉ. सुधीर मोरे, पोकॉ. जगदीश बडगुजर |
| मार्गदर्शन | १) मा. श्री भारत तांगडे, पोलीस अधीक्षक<br>२) मा. श्री. माधव रेडडी, अपर पोलीस अधीक्षक<br>३) मा. श्री. सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक |

**लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय/ निम शासकिय अधिकारी / कर्मचारी अथवा खाजगी पंटर यांनी काम करुन देण्यास लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे येथे संपर्क साधावा.**

**"लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे आपले सेवेशी सदैव तत्पर"**


**संपर्क पत्ता** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, धुळे
**संकेतस्थळ** :— acbmaharashtra.gov.in
**ईमेल** :— dyspacbdhule@gmail.com
**टोलफ्री क्रमांक** :— १०६४
**दुरध्वनी क्रमांक** :— ०२५६२—२३४०२०
**व्हॉटसअॅप क्रमांक** :— ७७९८१६१०६४